| CNR No.MHKO200000432025 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | - | १८.०१.२०२५ | | |
| | नोंदणी तारीख | - | २०.०१.२०२५ | | |
| | निकाल तारीख | - | १०.०३.२०२६ | | |
| | कालावधी | - | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०१ | ०१ | २३ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात (पिठासीन अधिकारी श्रीमती व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.२८/२०२५**

**निशाणी क्रं.७/ब सोबत**

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक–१० मार्च, २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१३५/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत सहाय्यक पोलीस निरीक्षक,<br>कळे पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | श्रीमती एस.आर. जाधव |
| आरोपी | | अशोक गजानन वाळवकेकर, व.व.३८, |
| | | रा. वाळवेकरवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| आरोपींतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही. एस. पाटील |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | १९.१०.२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | | १९.१०.२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १८.०१.२०२५ |
| प्ली नोंदविलेचा दिनांक | | ०९.०९.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | २३.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | | -- |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | | -- |

## आरोपीची माहिती

| अ.क. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अशोक गजानन वाळवेकर | फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटिस दिली. | ०९.०९.२०२५ | महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## <u>भाग-क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

### सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सुनिल लहू खाडे | फिर्यादी | ७ |

**ब. बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| - | निरंक | - | - |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| - | निरंक | - | - |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ८ | फिर्याद |
| २. | ९ | रासायनिक पृथकरणाचा अहवाल |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ७ | प्ली |

**ड.भौतिक वस्तु**

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | -- | देशी दारू पहिली धार कृष्णा संत्र १८० मिलीच्या १८ बॉटल्स, देशी दारु जी.एम.डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या १५ बॉटल्स |

**- न्या य नि र्ण य -**

**(घोषित दिनांक १० मार्च, २०२६)**

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र गुन्हयाचा खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की :-**

**०२.** दिनांक १९/१०/२०२४ रोजी १६.४५ वाजताचे सुमारास कळे ते बाजारभोगाव जाणारे रोडवर काटेभोगाव गावचे हद्दीत अमर चायनिजच्या शेजारी आडोशास आरोपीने त्याचे स्वत:चे फायदयाकरीता बिगर परवाना बेकायदा देशी दारू पहिली धार कृष्णा संत्र १८० मिलीच्या १८ बॉटल्स व देशी दारु जी.एम.डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या १५ बॉटल्स हा प्रोहीबिशन गुन्हयाचा मुद्देमाल विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगलेला मिळुन आला.

**०३.** फिर्यादीचे तक्रारीवरुन आरोपीविरुध्द कळे पोलीस ठाणे, गु.र.क्र.१३५/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंदवणेत आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल ब.नं.२/६७८ एम. डी.

माळवदे यांनी केला असुन तपासादरम्यान त्यांनी मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला, तपास टिपण्ण नोंदविले, नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता पाठवला व तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय फौजदारी प्रकिया संहिता कलम १७३ अन्वये अंतिम अहवाल न्यायालयात दाखल करण्यात आला.

**०४.** मी गुन्हयाचा सारांश आरोपीस वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने अपराध कबुल नाही असे सांगुन त्याच्याविरुध्द संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. त्याप्रमाणे आरोपीची प्ली (नि.क्र.७) नोंदवली. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी एका साक्षीदाराचा साक्षीपुरावा नोंदवला असुन काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. तद्नंतर अभियोगपक्षाने नि.क्र.१० कडे पुरसीस दाखल करुन पुरावा बंद करत असल्याचे न्यायालयास कळवले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदवले असता आरोपीने खोटी केस असल्याचा बचावाचा पावित्रा घेतला, परंतु आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही पुरावा सादर केला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे-

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दिनांक १९/१०/२०२४ रोजी १६.४५ वाजताचे सुमारास कळे ते बाजारभोगाव जाणारे रोडवर काटेभोगाव गावचे हद्दीत अमर चायनिजच्या शेजारी आडोशास आरोपीने त्याचे स्वत:चे फायदयाकरीता बिगर परवाना बेकायदा देशी दारू पहिली धार कृष्णा संत्र १८० मिलीच्या १८ बॉटल्स व देशी दारु | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | जी.एम.डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या १५ बॉटल्स हा प्रोहीबिशन गुन्हयाचा मुद्देमाल विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगलेला मिळुन आला आणि त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | |
| २. | कोणता आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

**- <u>कारणमिमांसा</u> -**

**<u>मुद्दा क्र.१ करिता:-</u>**

**०६.** अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०७.** अभियोगपक्षाचे मुख्य साक्षीदार क्रं.१ सुनिल लहू खाडे (फिर्यादी) यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.१९/१०/२०२४ रोजी ते कळे पोलीस स्टेशनला पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत असताना त्या दिवशी सहाय्यक पोलीस निरिक्षक रणजित पाटील यांनी अवैद्य धंदयावर कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले. त्यानुसार दोन पंचाना पोलीस हेड कॉन्स्टेबल माळवदे यांनी बोलावुन घेतले. त्यांनतर ते, पंच व इतर स्टाफ खाजगी वाहनाने घटनास्थळी पोहोचले, त्यांनी १६.४५ च्या सुमारस खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करत असताना कळे ते बाजारभोगाव रोडवर काटे भोगाव ता. पन्हाळा गावच्या हद्दीत काटे भोगाव येथे अमर चायनिजच्या शेजारी आडोशास एक इसम बेकायदेशिररित्या चोरुन दारु विक्री करीत असलेचे आढळून आला. त्याने त्याचे नाव अशोक गजानन वाळवेकर असल्याचे सांगितले. त्या इसमाच्या ताब्यातून देशी दारू पहिली धार कृष्णा संत्र १८० मिलीच्या १८ बॉटल्स व देशी दारु जी.एम.डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या १५ बॉटल्स हा मुद्देमाल मिळून आला.

त्यानंतर पोलीस हेड कॉन्स्टेबल माळवदे यांनी पंचनामा करुन मुद्देमाल जप्त करुन घेतला. त्यांनी सदर कारवाईनुसार अभियोगपक्षातर्फे फिर्याद नि.क्र.८ दिली. तसेच रासायनिक पृथकरणचा अहवाल नि.क्र.९ दाखवला असता तो तोच असल्याचे सांगितले. आरोपी न्यायालयात हजर असुन त्यांनी आरोपीस ओळखले. सदर साक्षीदाराचा आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे कबुल केले की, दि.२५/०५/२०२४ रोजी त्याच्या वरिष्ठांनी दिलेला आदेश मौखीक स्वरुपाचा होता. ते ज्या खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले त्या खाजगी वाहनाचा नंबर, चालकाचे नाव व पत्ता फिर्यादी साक्षीदार सांगू शकलेला नाही. त्यांनी कारवाईच्या वेळी आरोपी यांचे आधारकार्ड व मतदार ओळखपत्र पाहिले नव्हते. येथे एक बाब नमुद करणे आवश्यक आहे की, आरोपीचे विधीज्ञांनी आरोपीच्या ओळखीबाबत व कारवाईचे आदेश नसलेबाबत आक्षेप नोंदवला असुन अभिलेखावर कारवाईचे आदेश दाखल नाहीत तर घटनास्थळावरील आरोपीची ओळख पटवण्यासाठी कोणताही पुरावा पडताळलेचे दिसत नाही.

०८. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या मौखिक पुराव्याचे व कागदोपत्री पुराव्यांचे एकंदरीत मूल्यमापन करता असे दिसुन येते की, जरी फिर्यादी यांनी आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा केला आहे असे कथन केले असले तरी त्यांना कारवाईसाठी वापरणेत आलेल्या खाजगी वाहनाचा नंबर, चालकाचे नाव व पत्ता सांगता आलेला नाही. तसेच आरोपीची घटनास्थळावर ओळखपत्राद्वारे ओळख पडताळणी केल्याचे दिसत नाही. अभियोपगपक्षाने नि.क्र.९ कडील रासायनिक पृथकरण अहवालावर जरी आपली भिस्त ठेवली असली तरी, घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेकरीता पंच साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेकरीता अभियोगपक्ष असमर्थ राहिला. त्यामुळे नमुद प्रोहीबीशनचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करणेत आला हे सिध्द होताना दिसत नाही. प्रत्यक्षदर्शी व स्वतंत्र साक्षीदार तपासल्याचे दिसून येत नाही. अभियोगपक्षाचा पुरावा आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता पुरेसा नाही. अशा परिस्थितीत आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररित्या देशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगुन असताना मिळुन आलेचे अभियोग पक्षाने रास्त शंकेपलिकडे

जावून सिध्द केलेले नसल्याचे मतास मी आले आहे. म्हणून मी **मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करिता-</u>**

**९.** मुद्दा क्र.१ चे उत्तरावरुन अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे सिध्द केला नसल्यामुळे आरापी हा प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत कामी पिडीत अगर नुकसानग्रस्त कोणीही नसलेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५७-अ प्रमाणे नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता नाही. जप्त प्रोहीबिशनचा मुद्देमाल हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे पुढील विल्हेवाट लावण्यासाठी पाठविणे न्यायोचित होणार आहे. अंतिमत: मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे-

**<u>- अंतिम आदेश -</u>**

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी **अशोक गजानन वाळवेकर** रा. वाळवेकरवाडी,ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **२.** | आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| **३.** | जप्त मुद्देमाल देशी दारू पहिली धार कृष्णा संत्र १८० मिलीच्या १८ बॉटल्स, देशी दारु जी.एम.डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या १५ बॉटल्स हा मुद्देमाल अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे पुढील विल्हेवाट लावण्यासाठी पाठविणेत यावा. |
| **४.** | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे मा. अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी रक्कम रुपये १५,०००/- वैयक्तीक जातमुचलका लिहून दयावा. |
| **५.** | मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रंजना शांतिलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुळशीराम गुप्ता क्रिमी.अपिल (एस.टी.) नंबर |

| | |
|---|---|
| | ३९०/२०१९ या न्यायनिवाडयात निर्देशित केलेप्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

VAISHALI Digitally signed by VAISHALI Date: 2026.03.10 18:48:52 +0530

कळे-खेरीवडे. **(व्ही.ए.लावंड-कोकाटे)**
दिनांक.१०.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे-खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.